**महाराष्ट्र राज्य विद्युत वितरण कंपनी मर्यादित**
**ग्राहक तक्रार निवारण मंच**
**कोल्हापूर परिमंडळ, कोल्हापूर यांचे समोर**

ग्राहक तक्रार क्र. २२–०९/ दिनांक :

श्री. सावळा तुका कोळेकर,
मु.पो. लोहगांव, ता. जत, जि. सांगली अर्जदार

**विरूध्द**

१) कार्यकारी अभियंता (का.) तथा नोडल ऑफीसर,
म.रा.वि.वितरण कं.लि.,संवसु मंडळ कार्यालय,
मंडल कार्यालय, विश्रामबाग, सांगली विरूध्द
पक्षकार

२) कार्यकारी अभियंता
म.रा.वि.वि. कंपनी मर्यादित,
विभागीय कार्यालय, कवठे महांकाळ, जि. सांगली

३) उप कार्यकारी अभियंता,
म.रा.वि.वि. कंपनी मर्यादित,
उप विभागीय कार्यालय, जत, जि. सांगली

**कोरम :–** १) श्री. के.वाय. जगताप, अध्यक्ष,
२) श्री. एस.आर. बांबळे, सदस्य–सचिव
३) श्री. जी.सी. लेले, सदस्य

महाराष्ट्र राज्य विद्युत नियामक आयोग
(ग्राहक तक्रार निवारण मंच)
विनियम २००६ मधील ८.२ चे तरतुदीनुसार

## <u>न्याय निर्णय</u>

<u>श्री. एस.आर.बांबळे, सदस्य सचिव, ग्रा.त.नि.मंच यांचे तर्फे</u>  दिनांक : ११.०५.२००९

श्री. सावळा तुका कोळेकर, मु.पो. लोहगांव, ता. जत, जि. सांगली (तक्रार प्रकरण क्र. २२/०९) शेतीपंपासाठी नवीन वीज जोडणी मिळण्या करीता केलेल्या अर्जानुसार वि.प.कडून मंजुरी होऊन कोटेशन देणेस विलंब झालेने नुकसान भरपाई एसओपी प्रमाणे मिळाली नसले बाबत मंचाकडे दाखल प्रकरणावर खालील प्रमाणे न्यायनिर्णय देणेत येत आहे.

श्री. सावळा तुका कोळेकर, रा. मु.पो. लोहगांव, ता. जत, जि. सांगली यांनी ३ अश्वशक्ती शेतीपंपास नवीन वीज जोडणी मिळावी या करीता वितरण कंपनीकडे अर्ज केला आहे. त्यानुसार मंजुरी मिळून डिपॉझिट भरण्यास कोटेशन मिळण्यास विलंब झाला. त्याबाबत एसओपी प्रमाणे नुकसान भरपाई मिळावी अशी तक्रार आहे.

तक्रारदार यांनी अंतर्गत तक्रार निवारण कक्ष, सांगली यांजकडे प्रकरण क्र. ६७९ दि. २७.११.२००८ रोजी क्ष नमुना अर्जात तक्रार दाखल केली होती. त्याबाबत कक्षाने सुनावणी घेऊन आदेश पत्र क्र. ९६२ दि. ३०.१.२००९ ने निर्णय दिला आहे. सदर निर्णय मान्य न झालेने ग्राहकाने तक्रार निवारण मंच, कोल्हापूर यांजकडे दि. १७.३.२००९ ला अपील दाखल केले आहे. त्यावर मंचाने संबंधितांनकडून मुद्देनिहाय अहवाल मागविला व सुनावणी दि. २१.४.२००९ रोजी सांगली येथे ठेवली. ती पुढे ढकलून दि. ५.५.२००९ रोजी पार पडली.

सुनावणीवेळी तक्रारदार व प्रतिनिधी हजर नव्हते. परंतु प्रतिनिधीचा हजर राहू शकत नसलेचा दूरध्वनी मिळाला. वि.प.तर्फे श्री. बी. बी. भोसले, कार्यकारी अभियंता व श्री. कुलकर्णी, कनिष्ठ अभियंता, कवठे महांकाळ विभाग व श्री. दिवटे, सहाय्यक अभियंता, संख उप विभाग हजर होते.

<u>तक्रारदाराची तक्रार</u>

लोहगांव, ता. जत, जि. सांगली येथे अर्जदारानी ३ अश्वशक्ती शेतीपंपास वीज जोडणी मिळणेस वितरण कंपनीकडे मागणी अर्ज केला आहे. त्यानुसार प्रकरणास मंजुरी मिळाली व कोटेशन देणेस झालेल्या विलंबापोटी एसओपी प्रमाणे भरपाई मिळावी असा आदेश अंतर्गत तक्रार निवारण कक्षात तक्रार दाखल केली असता त्यांचे निकालपत्रात झाला नाही. वि.प.ने ३०.१२.२००८ दिनांक नमूद असलेले चलन त्यादिवशी न देता अहवालात दिनांक १३.१२.२००८ नमूद केली आहे व विलंबापोटी विनियमाचे कृती मानके नुसार नुकसान भपाई मिळावी.

<u>वितरण कंपनी म्हणणे</u>

३ अश्वशक्ती शेतीपंप वीज जोडणी मिळणे करीता तक्रारदाराचा अर्ज दि. २६.११.२००८ रोजी मिळाला. सर्व्हे व इतर कार्यवाही होऊन अंदजपत्रकास मंजुरी दि. २४.१२.२००८ रोजी देण्यात आली व ग्राहकास जोडणीचे कोटेशन भरणेस दि. ३१.१२.२००८ रोजी चलन देणेत आले. तक्रारदाराने अंतर्गत तक्रार निवारण कक्षाचे निकालात नुकसान भरपाईचा आदेश दिला नाही या म्हणण्यात तथ्य नाही. कक्षाचे संदर्भ २ चे अनुषंगाने भरपाईचा आदेश दिला आहे. तक्रारदार यांना दि. ३१.१२.२००८ रोजी चलन देणेत आले आहे. कक्षास नजरचुकीने १३.१२.२००८ तारीख कळविण्यात आली. वितरण कंपनी खोटे बोलते हे म्हणणे चुकीचे ठरेल.



सदस्य सचिव यांचा निष्कर्ष

तक्रारदार यांनी वि.प.कडे ३ अश्वशक्ती शेतीपंपास वीज जोडणी मिळण्यासाठी दि. २६.११.२००८ रोजी अर्ज करुन मागणी केली आहे व त्यानुसार वि.प.ने मंजुरी देऊन डिपॉझिट रक्कम भणेस चलन दि. ३१.१२.२००८ रोजी दिले आहे. कक्षाचे निर्णयात एसओपी नुसार कोटेशन देणेस झालेचे विलंबापोटी नुकसान भरपाई मिळावी असे कक्षाचे निकालपत्र क्र. ९६२ दि. ३०.०१.२००९ मध्ये नमूद आहे. त्यामुळे तक्रारदाराचा आरोप खोटा ठरतो. एसओपी प्रमाणे कोटेशन देणेस १३ दिवसांचा विलंब झालेचे दिसते. अंतर्गत कक्षाने नुकसाना भरपाई देण्याबाबत आदेश देतांना नुकसान भरपाईची रक्कम नमूद केली नाही. म्हणून सदर विलंबास्तव नुकसान भरपाई देणे योग्य ठरते.

दोन्ही बाजूंचे म्हणणे, युक्तीवाद, उपलब्ध कागदपत्रे इ. विचारांत घेवून सदस्य सचिव यांजकडून खालील प्रमाणे आदेश देणेत येत आहेत.

## आदेश

१) मा.आयोगाचे कृती मानके विनियम २००५ नुसार तक्रारदार यांना वि.प.कडून कोटेशन देणेस झालेल्या विलंबास्तव २ आठवडे x रु. १००/- = रु. २००/- भरपाई म्हणून देणेत यावे.

२) या निर्णयाविरूध्द तक्रारदार यांना अपील करावयाचे असलेस त्यांना आदेशाच्या तारखेपासून ६० दिवसांचे आंत मा. विद्युत लोकपाल, केशवा, बांद्रा-कुर्ला कॉम्प्लेक्स, बांद्रा (पूर्व), मुंबई-५१ यांजकडे करता येईल.

दिनांक : ११.०५.२००९ ( एस. आर. बांबळे )

सदस्य सचिव

श्री. काकासाहेब य. जगताप, अध्यक्ष :

श्री. जी. सी. लेले, ग्राहक सदस्य :